मंगळवार दि. २० ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ४८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# बनावट HSRP नंबर प्लेटचा पर्दाफाश

## ३.३६ लाखांचा मुद्देमाल जप्त, दुचाकी चोरीचाही उलगडा! स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**जालना - प्रतिनिधी**

चोरीच्या मोटारसायकलला बनावट हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट () बनवून लावल्याचा प्रकार जालन्यात उघडकीस आला आहे. या प्रकरणात बनावट नंबर प्लेट तयार करून देणाऱ्या दोन व्यावसायिकांसह चोरीची मोटारसायकल ताब्यात ठेवणाऱ्या व्यक्तीला आणि दुचाकी चोरीच्या प्रकरणातील आणखी एका संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने केलेल्या या कारवाईत दुचाकीसह नंबर प्लेट तयार करण्यासाठी वापरली जाणारी हायड्रॉलिक मशीन, हीटिंग मशीन आणि इतर साहित्य असा एकूण ३ लाख ३६ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या तपासातून राजूर परिसरातून २०२४ मध्ये चोरी झालेल्या मोटारसायकलचा गुन्हाही उघडकीस आला आहे.

जिल्ह्यातील मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना निर्देश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चोरीच्या दुचाकींचा शोध घेत होते.

१८ ऑक्टोबर २०२६ रोजी पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शेख राजेक शेख मुबारक (वय २६, रा. संजयनगर, जालना) याच्याकडे असलेल्या होंडा शाईन मोटारसायकलवर बनावट नंबर प्लेट लावण्यात आली आहे. या



माहितीच्या आधारे पोलिसांनी भवानीनगर परिसरात त्याचा शोध घेतला. मोटारसायकलवरील नंबर प्लेट आणि वाहनाचे इंजिन व चेसीस क्रमांक तपासले असता त्यांच्यात तफावत आढळल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर नंबर प्लेट कोणी तयार करून दिली, याची चौकशी करण्यात आली. पोलिसांच्या माहितीनुसार, शेख राजेक याने रॉयल रेडियम, जालना येथील मालक शेख परवेज शेख गणी (वय ३६, रा. शेरसवारनगर, जालना) आणि एस.एन. टेक्नॉलॉजी, विशाल कॉर्नर, जालना येथील मालक राहुल पंढरीनाथ मुनेश्वर (वय ४०, रा. सुंदरनगर, चंदनझिरा, जालना) यांनी संबंधित नंबर प्लेट बनवून दिल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी या दोघांनाही ताब्यात घेऊन चौकशी केली. वाहनाच्या कागदपत्रांची पडताळणी न करता आणि नंबर प्लेट तयार करण्यासाठी आवश्यक अधिकृत परवाना नसताना आर्थिक फायद्यासाठी नंबर प्लेट बनवून दिल्याची माहिती तपासात समोर आल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. या प्रकरणी तिन्ही आरोपींविरुद्ध कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६०२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३१८ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशीदरम्यान शेख राजेक याच्याकडे असलेली होंडा शाईन मोटारसायकल त्याने सैय्यद अल्ताफ सैय्यद अहमद (वय २४, रा. नॅशनलनगर, जालना) आणि एका विधिसंघर्षग्रस्त बालकाकडून २०२४ मध्ये विकत घेतल्याचे सांगितल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर पोलिसांनी सैय्यद अल्ताफ आणि संबंधित विधिसंघर्षग्रस्त बालकाबाबत तपास केला. पोलिसांच्या माहितीनुसार, संबंधित मोटारसायकल २०२४ मध्ये राजूर येथून चोरी करण्यात आली होती. या प्रकरणी हसनाबाद पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १४८/२०२४ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३७९ अंतर्गत गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न *(पान २ वर)*

## विभागीय माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीसाठी दरपत्रके द्यावीत

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय माहिती कार्यालयातील जुनी वृत्तपत्राची रदी विक्री करावयाचीअसल्याने त्यासाठी वृत्तपत्र रद्दी खरेदी विक्रीदार यांच्याकडून मंगळवार दि. २७ ऑक्टोबर २०२६ दुपारी २ वाजेपर्यंत दरपत्रके मागविण्यात येत आहे. वृत्तपत्र रद्दी पाहणी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत करता येईल. रद्दी विकत घेऊ इच्छिणा-यांनी विभागीय माहिती कार्यालय, अरिहंत' सिटीसर्व्हे क्र.२७१४, खडकेश्वर, छत्रपती संभाजीनगर येथे समक्ष भेट देऊन रद्दीची पाहणी करावी व दरपत्रक सादर करावे, असे आवाहन उपसंचालक माहिती कार्यालयामार्फत करण्यात येत आहे.

## जालना जिल्ह्यात २२ ऑक्टोबरपासून खत विक्रीसाठी FFS प्रणाली अनिवार्य

### शेतकऱ्यांना आधार क्रमांक, Farmer ID आणि मोबाईल OTP द्वारे करता येणार खत खरेदी; QR कोड किंवा टोकन नंबरचा वापर

**जालना – प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रासायनिक खतांची विक्री अधिक पारदर्शक, सुलभ आणि नियोजनबद्ध पद्धतीने करण्यासाठी केंद्र शासनाच्या ‘Framework for Fertilizer Sale’ (FFS) प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यात २२ ऑक्टोबर २०२६ पासून या प्रणालीद्वारे खत विक्री प्रक्रिया राबविण्यात येणार असून, शेतकऱ्यांनी या नव्या पद्धतीची माहिती घेऊन त्यानुसार खत खरेदी करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने केले आहे.

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार रासायनिक खतांची खरेदी सुलभ, पारदर्शक आणि शेतकऱ्यांच्या गरजांनुसार करण्यासाठी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. ही प्रणाली मोबाईल ॲपवर आधारित असून, महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने तिची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात काही जिल्ह्यांत ही प्रणाली लागू केल्यानंतर आता जालना जिल्ह्यासह उर्वरित जिल्ह्यांतही तिची अंमलबजावणी केली जाणार आहे.

**Farmer ID किंवा आधार क्रमांकाच्या आधारे नोंदणी**

FFS प्रणालीद्वारे खत खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रथम मोबाईल ॲपच्या माध्यमातून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे Farmer ID उपलब्ध आहे, ते Farmer ID चा वापर करून प्रणालीमध्ये लॉगिन करू शकतील. यासाठी नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या OTP द्वारे पडताळणी केली जाईल. त्यानंतर संबंधित शेतकऱ्याच्या जमिनीची माहिती प्रणालीमध्ये उपलब्ध होऊ शकते.

ज्या शेतकऱ्यांकडे उपलब्ध नाही, त्यांना आधार क्रमांकाच्या आधारे अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध असेल. यासाठी आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक आवश्यक राहणार आहे. शेतकऱ्यांनी सर्वप्रथम आपली वैयक्तिक माहिती, जमिनीचे क्षेत्रफळ आणि पिकांची माहिती योग्य प्रकारे नोंदविणे आवश्यक आहे.

**पिकांच्या क्षेत्रानुसार मिळणार खताची शिफारस**

नोंदणी आणि माहितीची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ, पिकांचा प्रकार आणि इतर संबंधित माहितीच्या आधारे खतांची शिफारस उपलब्ध *(पान २ वर)*

## स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना हरियाणा सरकारच्या धर्तीवर निवृत्ती वेतन मंजूर करा अन्यथा आंदोलन करणार - बाबासाहेब कोलते

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकाच्या वारसांना हरियाना सरकारच्या धर्तीवर निवृत्ती वेतन मंजूर करून स्वातंत्र्य सैनिकाच्या नामनिर्देशित पाल्यांना शासन सेवेत सामावून घ्यावे अन्यथा प्रजासत्ताकदिनी २६ जानेवारी २०२७ पासून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वातंत्र्य सैनिक पाल्य युवक समितीच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा स्वातंत्र्य सैनिक पाल्य समितीचे प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब पाटील कोलते यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना एका



निवेदनाद्वारे दिला आहे. मुख्यमंत्री यांना पाठविलेल्या निवेदनात बाबासाहेब कोलते यांनी म्हटले आहे की, महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिक व वारस पत्नी मयत झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसांना तसेच त्यांच्या मुलामुलींना हरियाणा सरकारच्या धर्तीवर निवृत्तीवेतन मंजूर करावे कारण भारत देशातील हरियाणा सरकारने राज्यातील मयत झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या वारस मुलामुलींना दि. १५ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून निवृत्तीवेतन सुरु केले आहे त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलामुलींना निवृत्तीवेतन मंजूर करावे. केंद्र व राज्यशासनाने स्वातंत्र्य सैनिक मयत झाल्यानंतर त्यांना मिळणारे निवृत्तीवेतन शासनाकडून नियमानुसार बंद होते परंतु मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या कार्याची *(पान २ वर)*

## औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली मतदान केंद्र आणि सुरक्षा कक्षाची पाहणी

**जालना - प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेतील पदवीधर मतदारसंघातील जागांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. याअनुषंगाने ०५ औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघासाठी दि. २३ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ०८.०० ते ०४.०० या वेळेत जालना जिल्ह्यातील ८९ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा प्रशासनाने तयारीला वेग आला आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी



आशिमा मित्तल यांनी आज ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ यांनी जालना शहरातील मतदान केंद्र क्रमांक २३२, जिल्हा औद्योगिक व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय खोली क्रमांक ०१ मतदान केंद्राची पाहणी केली. यावेळी पोलीस अधिक्षक तेगबीर सिंग सिंधू, उप विभागीय अधिकारी रामदास दौंड, जालना महानगर पालीका उप आयुक्त श्रीमती गायकवाड, तहसिलदार, निवडणूक विभागाचे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी मित्तल यांनी मतदान केंद्रावरील पिण्याचे पाणी, वीज,शौचालय, बैठक व्यवस्था, दिव्यांग मतदारासाठी रॅम्प, तसेच सोयी-सुविधा याबाबत पाहणी केली. तसेच सर्व मतदान केंद्रावर किमान मूलभूत सुविधा असाव्यात आणि मतदारांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

तसेच बदनापूर तालूक्यातील शेलगाव येथील मतदान केंद्र क्रमांक २४७, जिल्हा व परिषद प्रशाला खोली क्रमांक १ व बदनापूर येथील २४२, जिल्हा परिषद प्रशाला नवी इमारत, खोली क्रमांक १ बदनापूर व मतदान केंद्र क्र. २४३, जिल्हा परिषद प्रशाला नवी इमारत, खोली क्रमांक २ बदनापूरची पाहणी केली. तसेच बदनापूर येथील उप कोषागार कार्यालयातील सुरक्षा कक्षाची जिल्हाधिकारी *(पान २ वर)*

## जालन्यात गावठी पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसांसह तरुण जेरबंद!

### कदीम जालना पोलिसांची मध्यरात्री कारवाई; ७३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील जुन्या बसस्थानकाजवळील रेल्वे स्टेशन परिसरात गावठी बनावटीचे पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या २६ वर्षीय तरुणाला कदीम जालना पोलिसांनी अटक केली. गौरव उर्फ गणेश योगराज मांडोळे (रा. रूपनगर, अंबड चौफुली, जालना) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडून पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे आणि मोबाईल असा एकूण ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई १८ ऑक्टोबर रोजी पहाटे करण्यात आली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. जुन्या जालना परिसरातील रेल्वे स्टेशनजवळील जुन्या बसस्थानकाजवळ एक व्यक्ती अवैध शस्त्र घेऊन उभी असून, ती गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची वरिष्ठ अधिकाऱ्यांना कल्पना देण्यात आली. त्यानंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली कदीम जालना पोलीस ठाण्याचे पथक कारवाईसाठी रवाना झाले. पोलिसांनी संबंधित परिसरात सापळा रचला. पहाटे साडेतीनच्या सुमारास संशयित गौरव उर्फ गणेश मांडोळे याला ताब्यात घेण्यात आले.

आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडे गावठी बनावटीचे एक पिस्तूल आणि त्याच्या मॅगझीनमध्ये तीन जिवंत काडतुसे आढळून आली. तसेच त्याच्याकडील विवो कंपनीचा मोबाईल फोनही पोलिसांनी जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या गावठी पिस्तुलाची अंदाजे किंमत ५० हजार रुपये, तीन जिवंत काडतुसांची किंमत तीन हजार रुपये, तर मोबाईलची किंमत २० हजार रुपये असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. अशा प्रकारे एकूण ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६००/२०२६ अन्वये शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ३ व २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अवैध शस्त्र कोठून मिळाले, त्याच्याकडे ते बाळगण्यामागील नेमका उद्देश काय होता आणि या प्रकरणाशी अन्य कोणी संबंधित आहे का, याबाबत तपासातून माहिती पुढे येण्याची शक्यता आहे.

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जे. बी. शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक अमोल चाटे, पोलीस हेड कॉन्स्टेबल सदाशिव राठोड, सचिन चौधरी, धनाजी कावळे, पोलीस कॉन्स्टेबल मतिन शेख, इम्रान खान, तराळ तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस हेड कॉन्स्टेबल सागर बाविस्कर यांनी ही कारवाई केली. शहरात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे अवैध शस्त्रांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. या प्रकरणातील पुढील तपासाकडे लक्ष लागले आहे.

## औरंगाबाद मतदारसंघात २३ ऑक्टोबरला मतदान; प्रशासनाची तयारी पूर्ण

### अधिकाऱ्यांना समन्वयाने काम करण्याचे निर्देश

**जालना - प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणूक कार्यक्रमांतर्गत गुरुवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली असून, मतदान प्रक्रिया सुरळीत, शांततेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. यासंदर्भात सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार, जालना यांना पाठविण्यात आलेल्या पत्रातून निवडणूक कामकाजाबाबत आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील मतदान केंद्रांवर निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक व्यवस्था करण्यावर प्रशासनाचा भर आहे. मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपापली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडावी, तसेच विविध विभागांमध्ये समन्वय राखून काम करण्याचे निर्देशित केले आहे. मतदान केंद्रांवरील व्यवस्थापन, आवश्यक सोयी-सुविधा आणि निवडणूकविषयक कामकाजाचे नियोजन याकडे विशेष लक्ष देण्याचे सूचित करण्यात आले आहे.निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि सुरळीत होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी वेळेत तयारी पूर्ण करणे आवश्यक आहे. मतदानाच्या दिवशी कोणताही अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी *(पान २ वर)*

# संपादकीय...

## वाळू उपसा की निसर्गाची लूट? कारवाई ट्रकवरच नव्हे, संपूर्ण साखळीवर कधी?

वाळू ही बांधकाम क्षेत्रासाठी आवश्यक असलेली नैसर्गिक संपत्ती; मात्र तिचा अनियंत्रित उपसा सुरू झाला की ती विकासाची गरज न राहता पर्यावरण, जलसुरक्षा आणि शासनाच्या महसुलापुढील गंभीर आव्हान बनते. जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील कुंभारझरी येथे दोन ट्रक जप्त करून सुमारे २० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केल्याची कारवाई याच प्रश्नाकडे लक्ष वेधते. महसूल विभाग आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने केलेली कारवाई निश्चितच महत्त्वाची आहे; परंतु या कारवाईनंतर उपस्थित होणारा मूलभूत प्रश्न असा की, अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरलेले ट्रक जप्त झाले, पण त्या वाळूचा स्रोत, उपसा करणारे, साठवणूकदार, वाहतूकदार आणि खरेदीदार यांची संपूर्ण साखळी उघड होणार का? कुंभारझरी येथे झालेल्या कारवाईत दोन ट्रक जप्त करण्यात आले असून, या प्रकरणात किशोर धवळे आणि ऋषिकेश सोनसळे यांची नावे समोर आल्याचे वृत्त आहे. संबंधितांची नेमकी भूमिका आणि वाळू वाहतुकीची वैधता तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे. केवळ नावे समोर येणे म्हणजे दोष सिद्ध होणे नव्हे; मात्र या प्रकरणाचा सखोल तपास होणे गरजेचे आहे. अवैध वाळू उपशाविरोधात कारवाई झाल्यानंतर काही काळ चर्चा होते. जप्तीची आकडेवारी समोर येते. संबंधित विभागांच्या कामगिरीची नोंद होते. परंतु काही दिवसांनी परिस्थिती पुन्हा पूर्ववत होत असेल, तर अशा कारवायांचा दीर्घकालीन परिणाम काय, हा प्रश्न विचारला जाणे स्वाभाविक आहे. एका ठिकाणी ट्रक पकडणे ही कारवाईची सुरुवात असू शकते; अंतिम यश नव्हे. वाळू कुठून काढली गेली? उपसा करण्यासाठी परवानगी होती का? वाहतुकीची कागदपत्रे वैध होती का? वाळू कोणाला पुरवली जाणार होती? या प्रश्नांची उत्तरे शोधल्याशिवाय अवैध व्यवसायाच्या मुळापर्यंत पोहोचता येणार नाही. वाळूचा अनियंत्रित उपसा हा केवळ महसूल विभागाच्या नियमभंगाचा विषय नाही. त्याचा संबंध नदीपात्राची रचना, पाण्याचा प्रवाह, भूजल पुनर्भरण आणि स्थानिक पर्यावरणाशी आहे. नदीतील वाळूचे प्रमाण आणि तिचे नैसर्गिक कार्य यांचा विचार न करता मोठ्या प्रमाणावर उपसा झाल्यास नदीपात्रात बदल होऊ शकतात. परिस्थितीनुसार नदीकाठाची धूप, पाण्याच्या प्रवाहातील बदल आणि भूजल पातळीवर परिणाम होण्याचा धोका वाढू शकतो. याचा परिणाम कोणाला भोगावा लागतो? वाळूच्या व्यवहारातून फायदा मिळवणाऱ्या प्रत्येकाला त्याचे परिणाम समान प्रमाणात भोगावे लागतातच असे नाही; परंतु पिण्याच्या पाण्यासाठी विहिरींवर अवलंबून असलेली गावे, शेती करणारे शेतकरी आणि नदीकाठच्या वस्त्यांमधील नागरिक यांच्यासाठी नैसर्गिक संसाधनांचे नुकसान गंभीर ठरू शकते.

आज काही ट्रक वाळू घेऊन जात असतील; पण उद्या पाण्याची पातळी, नदीपात्राची स्थिती आणि पर्यावरणीय समतोल याबाबत निर्माण होणाऱ्या समस्यांची किंमत संपूर्ण समाजाला मोजावी लागू शकते. म्हणूनच वाळू उपशाचा प्रश्न केवळ बांधकाम साहित्याच्या उपलब्धतेपुरता मर्यादित ठेवता येणार नाही. वाळू उत्खनन आणि वाहतुकीसाठी लागू असलेल्या परवानग्या व नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. नियमबाह्य उपसा किंवा वाहतूक होत असल्यास शासनाच्या महसुलावर परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर कायदेशीर मार्गाने व्यवसाय करणाऱ्यांसाठीही असमान परिस्थिती निर्माण होऊ शकते. मग प्रश्न असा की, अवैध वाळू उपसा किंवा वाहतूक आढळल्यावर संबंधित वाहन जप्त करणे पुरेसे आहे का? की वाळूच्या स्रोतापासून ते अंतिम विक्रीपर्यंतच्या व्यवहाराची तपासणी होणे आवश्यक आहे?

जप्त वाहनांतील वाळूचा स्रोत, वाहतुकीचा मार्ग, संबंधित परवाने, रॉयल्टी किंवा लागू शुल्क भरल्याचे पुरावे आणि व्यवहाराशी संबंधित नोंदी यांची पडताळणी झाली पाहिजे. नियमभंग सिद्ध झाल्यास संबंधित कायद्यांनुसार कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर कारवाईचा निकाल आणि वसूल झालेला दंड किंवा महसूल याची माहिती सार्वजनिक केल्यास प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता वाढू शकते.

अवैध वाळू वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ अचानक छापे पुरेसे ठरत नाहीत. संवेदनशील वाळूघाट, नदीपात्रे, वाहतुकीचे मार्ग आणि साठवणुकीची ठिकाणे यांची नियमित देखरेख आवश्यक आहे. वाहनांची तपासणी, परवान्यांची पडताळणी आणि तक्रारींवर वेळेत कारवाई करण्यासाठी महसूल व पोलीस विभागांमध्ये समन्वय असणे गरजेचे आहे.

यासोबतच तंत्रज्ञानाचा वापर, वाहनांच्या हालचालींची नोंद, तपासणी पथकांचे नियमित फेरबदल आणि कारवाईचा लेखाजोखा यांनाही महत्त्व आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई होत असेल, तर त्याचबरोबर अवैध उपसा रोखण्यासाठी कोणती प्रतिबंधात्मक पावले उचलली जात आहेत, हेही नागरिकांना समजले पाहिजे. कुंभारझरीतील कारवाईनंतर प्रशासनाने संबंधित वाळूचा स्रोत आणि वाहतुकीची वैधता तपासली का, याची माहिती समोर येणे महत्त्वाचे ठरेल. यामुळे कारवाई केवळ वाहन जप्त करण्यापुरती होती की अवैध वाळू व्यवहाराच्या मुळापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न झाला, हे स्पष्ट होऊ शकेल.

वाळूची मागणी ही वास्तवातील गरज आहे. घरे, रस्ते आणि इतर बांधकामांसाठी वाळूचा वापर होतो. मात्र, मागणी आहे म्हणून नैसर्गिक संसाधनांचा अनियंत्रित उपसा करण्याची मुभा मिळत नाही. कायदेशीर उत्खनन, पर्यावरणीय निकषांचे पालन, पारदर्शक लिलाव किंवा परवानगी प्रक्रिया आणि पर्यायी बांधकाम साहित्याचा योग्य वापर यांचा समन्वय साधणे आवश्यक आहे. अवैध वाळू उपशाला आळा घालायचा असेल, तर पुरवठ्याची कायदेशीर व्यवस्था सक्षम करणे आणि नियमभंग करणाऱ्यांवर निष्पक्ष कारवाई करणे या दोन्ही गोष्टी एकत्र झाल्या पाहिजेत. अन्यथा मागणी आणि पुरवठ्यातील तफावत अवैध व्यवहारांना वाव देत राहण्याचा धोका असतो. प्रशासनासमोर काही थेट प्रश्न कुंभारझरीतील कारवाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने काही बाबी स्पष्ट करणे आवश्यक आहे. - जप्त करण्यात आलेल्या दोन्ही ट्रकमधील वाळूचा नेमका स्रोत कोणता? - संबंधित वाळू उत्खनन आणि वाहतुकीसाठी आवश्यक परवानग्या होत्या का? - या प्रकरणात केवळ वाहनधारकांपुरती कारवाई होणार, की संपूर्ण पुरवठा साखळीची चौकशी होणार? - जालना जिल्ह्यातील संवेदनशील वाळूघाट आणि वाहतूक मार्गांवर नियमित तपासणीची यंत्रणा किती प्रभावी आहे? - यापूर्वी झालेल्या कारवायांमध्ये किती प्रकरणांचा तपास पूर्ण झाला आणि किती प्रकरणांत दंड किंवा इतर कायदेशीर कारवाई झाली? - नागरिकांना अवैध वाळू उपशाबाबत तक्रार नोंदवण्यासाठी प्रभावी आणि पारदर्शक व्यवस्था उपलब्ध आहे का?

# विजयादशमी ;दृष्टप्रवृत्तीचा नाश करून मिळालेला विजय

लंकापती रावन हे महान राजनितिज्ञ,ज्ञानी व पराक्रमी राजा होते म्हणूनच त्यांना लंकापती रावण संबोधले जायचे.परंतु त्यांच्यात काही दृष्ट, अहंकारी व वाईट प्रवृत्ती होत्या.त्यांनी माता सीतेचे हरण करून राक्षसीप्रवृतीचा आगास केला. हा त्यांचा सर्वात मोठा गुन्हा होता आणि यातुनच लंकापती रावण व राक्षस कुळाचा परास्त होण्याला सुरूवात झाली.यानंतर रावणाने पुर्णपणे अधर्माचा मार्ग पत्करला अधर्माचा मार्ग सोडण्यासाठी देवी-देवता,आप्त-नातेवाईक,राजनैतिज्ञ गुरूसह अनेकांनी प्रयत्न केले. परंतु रावणाच्या अहंकारापुढे संपूर्ण प्रयत्न निष्फळ ठरले व सीतेला हस्तगत करण्याच्या जीद्दीने रावणाने आपल्याच संपूर्ण कुळाला युध्दाच्या खाईत लोटले व लंकापती रावण यांच्या सर्वनाशाची आकाशवाणी झाली. हळूहळू संपूर्ण मोठ-मोठे बलाढ्य शुरविर धाराशाही झाले.यात मुख्यत्वेकरून मेघनाथ,कुंभकर्णासारखे महाबलशाली यांनाही रावणाने मृत्यूच्या खाईत लोटले.त्याच प्रवृत्तीचा नाश करण्यासाठीच प्रभुश्रीरामचंद्र हे पृथ्वीतलावर अवतरले व रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा रामानी वध केला. विजयादशमी म्हणजे असत्याचारावर सत्याचा विजय,अशुध्दतेवर शुध्दतेचा विजय, अंधारावर प्रकाशाचा विजय,अमानुषतेवर मानवतेचा विजय, निसर्गाचा होत असलेला ह्रास टिकवुन ठेवण्यासाठी वृक्षलागवड करणे हाही विजयच, म्हणजेच आत्म्यातील रावणाचे दहण करुन रामाने सांगितलेला सत्याचा मार्ग अवलंबने हाच खरा सण विजयादशमी होय. राम हे आदर्शपुरुष त्यामुळेच भारताने नेहमी आदर्शाचीच भुमिका जोपासली आहे.तेव्हाच भारतात सर्व धर्म समभाव दिसून येतो. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतित सर्वात महत्वाचा आणि शुभ दिवस म्हणजे ''विजयादशमी'' साडेतिन मुहुर्तापैकी एक असे या दिवसाला व सणाला आगळेवेगळे महत्व आहे. घटस्थापनेपासुन तर दसऱ्यापर्यत संपूर्ण भारतात उत्सहाचे, आनंदाचे व मांगल्याचे वातावरण आपल्याला पहायला मिळते व याच दिवसापासुन दिवाळीचा शंखनाद संपूर्ण भारतात गुंजतो. नवरात्र उत्सवामध्ये देवीची ९ दिवस आराधना करून नवरात्र उत्सव साजरा केला जातो व दशमीला म्हणजेच विजयादशमीला दसरा उत्सव मोठ्या थाटात भारतभर साजता केला जातो. हा दीवस म्हणजे असुरीशक्तीचा नाश व सत्याचा विजय मानले जाते. दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा संहार करुण असुरीशक्तीला संपवुन मानवतेचे रक्षण केले. त्या निमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. याच दीवशी मॉ जगदंबेने अनेक राक्षसाचा वध करुण विजय प्राप्त केला. त्याचप्रमाणे पांडव अज्ञातवासात असतांना पांडवांनी ''शम्मीच्या'' झाडावर लपविलेली शस्त्रे याच दीवशी काढण्यात आली व याच दीवशी रामाने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा वध करुन विजय प्राप्त केल्याच्या अनेक कथांमध्ये व पुराणांमध्ये आपल्याला पहायला मिळते. त्याच अनुशंगाने विजयादशमीला सोण्याच्या (आपट्याच्या) पाणाला तीतकेच अतुट महत्व आहे. सोण्याचे पान एकमेकांना देवुन आनंदोत्सव साजरा करतात व लहान-मोठ्यांना शुभेच्छा व आर्शिवाद देतात. त्याचप्रमाणे दसऱ्याच्या दिवशी सर्वसामान्य व शेतकरी आपल्या उपयोगात येणाऱ्या संपूर्ण शस्त्रांची (साहित्याची)पुजा करतांना फुलांसोबत सोण्याचे पाणांनी पुजा अर्चना केली जाते. यावरुन आपण समजु शकतो कि, सोण्याच्या पाणाला विजयादशमीच्या दिवशी कीती आगळेवेगळे महत्व आहे. देशात वाढते प्रदुषण, बदलते हवामान व अलनिनोचा प्रभाव पहाता विजयादशमीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे.कारण प्रत्येक झाडात,फुलात,फळात, मुळात देवीदेवतांचा वास असतोच.त्यामुळे वृक्षलागवडीने देवीदेवतांचे दर्शन अवश्य होईल सोबतच सर्वांना शुध्द हवा, ऑक्सिजन मिळेल व संपूर्ण जीव-जंतुंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होईल.सोबतच गुरांना चारा व सर्वांना सावलीचा आनंद घेता येईल.अशाप्रकारे सर्वत्र उत्साहाचे आणि मांगल्याचे वातावरण वृक्षलागवडीमुळे दिसून येईल. दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा! जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर**

# नवरात्र महोत्सवानिमित्त. आनंदवाडी देवीसमोर विद्यार्थ्यांचा दांडिया रास. नृत्य. कार्यक्रम उत्साहात साजरा

**सिंधीकाळेगाव - प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आनंदवाडी येथे शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी 'विद्यार्थ्यांचा आनंददायी शनिवार' या उपक्रमांतर्गत नवरात्रोत्सवानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी देवीच्या मंदिरासमोर सुंदर दांडिया रास सादर करून आनंदवाडी गावातील नागरिकांसह महिला मंडळाची मने जिंकली.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नवरात्रोत्सवाचे औचित्य साधत आकर्षक दांडिया नृत्य, शेतकरी गीतांवरील नृत्य, विविध गीतांवरील नृत्य तसेच टिपरी डान्स सादर केला.

विशेषतः 'आंबे गोंधळाला ये' या गाण्याचे सुंदर सादरीकरण उपस्थितांचे लक्ष वेधून घेणारे ठरले. विद्यार्थ्यांनी तालबद्ध नृत्य आणि उत्स्फूर्त सादरीकरणातून आपल्या कलागुणांचे दर्शन घडविले. विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट सादरीकरणाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या गजरात कौतुक केले.या कार्यक्रमाला माजी सरपंच ज्ञानेश्वर माऊली पडूळ, शालेय



अध्यक्ष बाबासाहेब गाडेकर, मुख्याध्यापक शिवानंद खरात सर, सहशिक्षक अनिल कोल्हे सर, माजी सरपंच लाला भाऊ खरात, अंबादास खरात, उद्धव अप्पा पडूळ, रामचंद्र दगलबाज, भागवत पडूळ, आबाजी घोलप, कृष्णा जगताप, संदीप पडूळ. विलास हिवाळे. सदानंद गाडेकर. सांडू कवळे. अर्जुन खांदवे, जनार्धन पडूळ नरवडे, माधव गाडेकर, रमेश पडुळ, शेषराव पडूळ, कृष्णा दगलबाज, आकाश गाडेकर, नितीन खरात, योगेश पडूळ, ज्ञानेश्वर चंदरे, राहुल जोगदंड आणि बाबुराव खांदवे यांच्यासह गावातील नागरिक व महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ व ४ वरुन...

### बनावट...

झाले.अशा प्रकारे बनावट नंबर प्लेट प्रकरणाचा तपास करताना पोलिसांना जुन्या दुचाकी चोरीच्या गुन्ह्यापर्यंत पोहोचता आले.

या कारवाईत पोलिसांनी एकूण ३ लाख ३६ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्यामध्ये सुमारे दोन लाख रुपये किमतीची हायड्रॉलिक मशीन, एक लाख रुपये किमतीची हीटिंग मशीन, ६५० रुपये किमतीचे रिबिट मशीन, सहा कोऱ्या अॅल्युमिनियम नंबर प्लेट, २१ नंबर प्लेट होलोग्राम स्टिकर, २१६५७१ व २३८०३६ क्रमांकाच्या नंबर प्लेट आणि ३५ हजार रुपये किमतीची होंडा शाईन मोटारसायकल यांचा समावेश आहे.

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, बाबा गायकवाड, शिवप्रसाद एखंडे, रमेश काळे, वसंत धस, धीरज भोसले, सुनील पवार आणि अशोक जाधवर यांनी ही कारवाई केली.

या प्रकरणामुळे वाहनांची खरेदी-विक्री करताना मूळ कागदपत्रे, नोंदणी क्रमांक, इंजिन क्रमांक आणि चेसीस क्रमांक यांची पडताळणी करण्याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. बनावट नंबर प्लेटचा वापर करून वाहनाची खरी ओळख लपविण्याचा प्रयत्न झाल्याचा संशय या प्रकरणातून समोर आला असून, यामागील संपूर्ण साखळीचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

### जालना जिल्ह्यात...

होणार आहे. यासाठी ॲपमध्ये 'General Fertilizer Recommendation' (GFR) ही सुविधा देण्यात आली आहे. या शिफारशीनुसार शेतकऱ्यांना आवश्यक खताचा प्रकार आणि त्याचे प्रमाण निश्चित करण्यास मदत होईल. त्यामुळे पिकांच्या गरजेनुसार खतांचा वापर करणे शक्य होणार असून, अनावश्यक खत खरेदी आणि अतिवापर टाळण्यास मदत होईल.

**निवडलेल्या खत विक्रेत्याकडून मिळणार QR कोड किंवा टोकन नंबर**

FFS प्रणालीमध्ये शेतकऱ्यांना उपलब्ध पर्यायांमधून खत विक्रेता (Retailer) निवडता येणार आहे. निवडलेल्या विक्रेत्याकडे आवश्यक खत उपलब्ध असल्यास शेतकऱ्यांना खरेदीची प्रक्रिया पूर्ण करता येईल.₹खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना संबंधित विक्रेत्याच्या दुकानात जाऊन ॲपमधील कोड दाखवावा लागेल किंवा प्रणालीतून प्राप्त झालेला टोकन नंबर द्यावा लागेल. त्यानंतर विक्रेता आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून शेतकऱ्याला खत उपलब्ध करून देईल. त्यामुळे खत खरेदीची नोंद डिजिटल पद्धतीने होणार असून, विक्री प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होईल.

खत खरेदीसाठी तीन दिवसांची मुदत

खत बुकिंग केल्यानंतर कोड किंवा टोकन नंबर प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत संबंधित शेतकऱ्याने रासायनिक खतांची खरेदी करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बुकिंग केल्यानंतर निर्धारित मुदतीत निवडलेल्या विक्रेत्याकडून खत खरेदी करावे.

**शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी?**

प्रणालीचा वापर करताना शेतकऱ्यांनी पुढील बाबींची काळजी घ्यावी :

मोबाईलमध्ये 'Framework for Fertilizer Sale हे ॲप डाउनलोड करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी.

उपलब्ध असल्यास त्याचा वापर करावा Farmer ID नसल्यास आधार क्रमांकाच्या आधारे अर्ज करावा.आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक कार्यरत असल्याची खात्री करावी, जेणेकरून पडताळणी करता येईल.

जमिनीचे क्षेत्रफळ, गाव, पिकांचा प्रकार आणि इतर माहिती अचूक भरावी.

ॲपमध्ये उपलब्ध शिफारशीनुसार आवश्यक खताचा प्रकार आणि प्रमाण निवडावे.

खत विक्रेता निवडल्यानंतर प्राप्त झालेला कोड किंवा टोकन नंबर जतन करून ठेवावा.

खत खरेदीसाठी प्रतिनिधी पाठवायचा असल्यास त्याच्या आधार क्रमांकाची व मोबाईल क्रमांकाची आवश्यक माहिती तयार ठेवावी.

**कोड किंवा टोकन नंबर मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत खत खरेदी करावी.**

ॲप कुठे मिळणार?' ' हे ॲप केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहे. शेतकरी हे ॲप वरून डाउनलोड करू शकतात. ॲपची लिंक पुढीलप्रमाणे आहे :https:// play. google.com/store/apps/details? id=com.agristack.fsas

जालना जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करून खत खरेदीची प्रक्रिया सुलभ आणि नियोजनबद्ध करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. जिल्ह्यातील तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, खत विक्रेते तसेच गुणनियंत्रण निरीक्षकांनी शेतकऱ्यांमध्ये या प्रणालीबाबत जनजागृती करावी आणि आवश्यक मार्गदर्शन करावे, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. या उपक्रमामुळे खत विक्री प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे, खतांच्या वितरणात पारदर्शकता वाढविणे आणि शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांच्या गरजेनुसार खत खरेदी करण्यास मदत होणे अपेक्षित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नव्या प्रणालीची माहिती घेऊन २२ ऑक्टोबरपासून खत खरेदी करताना प्रणालीचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने केले आहे. तालुकास्तरीय मदतीसाठी संपर्क : जालना, बदनापूर, भोकरदन, जाफराबाद, मंठा, परतूर, घनसावंगी आणि अंबड या तालुक्यांसाठी प्रसिद्धीपत्रकात कृषी अधिकारी कार्यालयांतील गुणनियंत्रण निरीक्षक तसेच पंचायत समिती कार्यालयांतील संबंधित अधिकाऱ्यांचे संपर्क तपशील देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या तालुक्यातील संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून FFS प्रणालीबाबत मार्गदर्शन घ्यावे.

### स्वातंत्र्य सैनिकांच्या...

नव्या पिढीला आठवण राहावी व थोर स्वातंत्र्य सैनिकांचा इतिहास हा त्यांच्या वारस मुला मुलींना कळावात्यासाठी स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील एका वारसांना निवृत्तीवेतन वारसाने मंजूर करावे. तसेच महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्या गेल्या अनेक दिवसांपासून शासनाने नोकर भरतीचा शासन निर्णयच रद्द केल्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून वंचित आहेत. त्यामुळे स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित पाल्यावर अन्याय झाला आहे. त्यामुळे नोकरीपासून वंचित असलेल्या नामनिर्देशित पाल्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना शासन सेवेत सामावून घेण्यासाठी तात्काळ शासन निर्णय निर्गमित करून नामनिर्देशित पाल्यांना १९९१ च्या शासन निर्णयाप्रमाणे शासन सेवेत सामावून घेण्यात यावे या बाबत स्वातंत्र्य सैनिक पाल्या समितीच्या वतीने अनेक वेळेस गेल्या १५ वर्षा पासून आम्ही राज्य शासनाकडे मागणी मंजूर करण्यासाठी निवेदने, आंदोलने केलेली आहेत परंतु राज्यशासनाने या बाबत अद्याप कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्यामुळे आम्ही प्रजासत्ताक दिनापासून दिनांक २६ जानेवारी २०२७ पासून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर स्वातंत्र्य सैनिक पाल्य युवक समितीच्या वतीने आंदोलन करणार आहोत असे बाबासाहेब कोलते यांनी निवेदनात म्हटले आहे.

### औरंगाबाद विभाग...

मित्तल यांनी पाहणी केली. यावेळी परिविक्षाधिन उप विभागीय अधिकारी श्रीमती बागुल, तहसिलदार श्री. हंदेश्वर, नायब तहसिलदार श्री .बने, बदनापुर नगर पंचायत मुख्याधिकारी विशाल पाटील, मंडळ अधिकारी श्रीमती मरमट यांच्यासह निवडणूक विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. मतदान केंद्रातील फॅन, लाईट, स्वच्छतागृह, दिव्यांग मतदारासाठी रॅम्प, तसेच सुरक्षा व्यमवस्थाक इत्यादीबाबत आढावा घेतला. बदनापूर येथील उप कोषागार कार्यालयातील सुरक्षाकक्षाची पाहणी दरम्यान सीसीटीव्ही यंत्रणा व सुरक्षा व्यवस्था सुस्थितीत कार्यान्वीत करणेबाबत जिल्हाधिकारी मित्तल यांनी निर्देश दिले.

### औरंगाबाद मतदारसंघात...

प्रशासनाकडून नियोजन करण्यात येत आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन करून सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करण्यावर भर देण्यात आला आहे.

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रशासनाने तयारीला गती दिली असून, मतदान प्रक्रिया नियोजित वेळेत पार पाडण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत आहेत.

### परतूर येथे ह.भ.प...

उन्नतीबरोबरच सामाजिक बांधिलकी, मानवसेवा आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचा संदेश मिळतो. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ अनेक भाविक आणि सेवेकरी घेत आहेत, असे त्यांनी सांगितले. परतूर शहरातील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर १६ फेब्रुवारी २०२४ रोजी परमपूज्य गुरुमाऊलींच्या प्रमुख उपस्थितीत भव्य शेतकरी सत्संग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात कृषी, विवाह, पर्यावरण, भारतीय अस्मिता आणि मानवी जीवनातील विविध समस्यांवर मार्गदर्शन करण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह समाजातील विविध घटकांच्या अडचणी समजून घेऊन त्यावर प्रबोधनात्मक मार्गदर्शन करण्याचा या उपक्रमामागील उद्देश होता, असे आमदार लोणीकर यांनी नमूद केले. पुढे बोलतांना आमदार लोणीकर यांनी २० टक्के अध्यात्म आणि ८० टक्के समाजसेवा' या विचारानुसार विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगून आमदार लोणीकर यांनी या कार्याचे महत्त्व स्पष्ट केले. मोफत विवाह नोंदणी, विविध कृषी मेळावे, शेतकऱ्यांसाठी मोफत प्रशिक्षण, बेरोजगार युवक-युवती आणि गरजू महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, मोफत आरोग्य शिबिरे, औषधांचे मोफत वाटप, गरजूंना महावस्त्रदान, अन्नदान तसेच पर्यावरण विभागाच्या माध्यमातून स्वच्छता अभियान असे अनेक उपक्रम समाजहितासाठी राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देणे, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती करणे, ही समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आवश्यक कामे आहेत. आध्यात्मिक विचारांची जोड समाजसेवेला मिळाल्यास समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असा संदेशही त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून दिला.

**संतविचार आत्मसात करून जीवन उन्नत करा - आमदार बबनराव लोणीकर**

परमपूज्य गुरुमाऊलींच्या विचारांचे सिंचन प्रत्येकाने आपल्या जीवनात करावे. सेवेकरी आणि भाविकांनी आध्यात्मिक मार्गदर्शनाचा लाभ घेत समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखावी. भक्तीबरोबरच मानवसेवा, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रहिताची भावना जोपासल्यास जीवन अधिक समृद्ध होईल, असे आवाहन आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या कीर्तन सेवेतून भक्ती आणि समाजप्रबोधनाचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. ह.भ.प. कांचनताई शेळके यांच्या कीर्तनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. आमदार बबनराव लोणीकर आणि मंदाताई लोणीकर यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या कीर्तन सेवेमुळे परतूर शहर आणि परिसरात आध्यात्मिक उत्साहाचे वातावरण निर्मान झाले.

# परतूर येथे ह.भ.प. कांचनताई शेळके यांची कीर्तन सेवा उत्साहात संपन्न

## ‘हेचि दान देगा देवा’ तुझा विसर न व्हावा या अभंगातून आध्यात्मिक प्रबोधन

**परतूर - प्रतिनिधी**

राहुलभैया लोणीकर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्र महोत्सवानिमित्त सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता परतूर येथे ह.भ.प. कांचनताई शेळके यांच्या कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तन सेवेला भाजपा नेते, माजी मंत्री तथा परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर आणि मंदाताई बबनराव लोणीकर यांनी उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घेतला. ‘हेचि दान देगा देवा’ या अभंगावर आधारित कीर्तन सेवेतून भक्ती, अध्यात्म, समाजप्रबोधन आणि मानवी जीवनातील मूल्यांचा संदेश देण्यात आला. या वेळी महिला भाविकांसह परिसरातील नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या कीर्तन सेवेमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ह.भ.प. कांचनताई शेळके यांनी अभंगाच्या माध्यमातून भक्तीचे महत्त्व, संतविचार, सदाचार आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांविषयी प्रबोधन केले. उपस्थित भाविकांनी भक्तिरसात तल्लीन होत कीर्तनाचा आनंद घेतला.

**वारकरी संप्रदायाची परंपरा जपण्याचे आवाहन**

या प्रसंगी आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन करत नवरात्र महोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्राला संतांची, वारकरी संप्रदायाची आणि समृद्ध आध्यात्मिक परंपरेची मोठी परंपरा लाभली आहे. संतांच्या विचारांतून समाजाला सदाचार, समता, बंधुभाव आणि मानवसेवेची प्रेरणा मिळते. कीर्तन, प्रवचन आणि भजनाच्या माध्यमातून हे विचार समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचतात. त्यामुळे अशा धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांना विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून अधोरेखित केले.

**शेगाव-पंढरपूर दिंडी महामार्गासाठी सातत्याने पाठपुरावा**

आपल्या भाषणात आमदार लोणीकर यांनी शेगाव-पंढरपूर दिंडी महामार्गाच्या निर्मितीसाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. ते म्हणाले की, महाराष्ट्रातील लाखो वारकरी दरवर्षी आषाढी वारीनिमित्त




पंढरपूरच्या विठ्ठलाच्या दर्शनासाठी पायी दिंड्यांमध्ये सहभागी होतात. शेगाव येथून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंडीत हजारो महिला, पुरुष, लहान मुले आणि मुली सहभागी होत असतात. मात्र, या वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अनेक वर्षांपासून गंभीर होता. सुमारे दहा वर्षांपूर्वी जालना जिल्ह्यातील अंबडजवळ शेगाव-पंढरपूर दिंडीदरम्यान ट्रक घुसल्याने भीषण अपघात झाला होता. या दुर्घटनेत अनेक वारकऱ्यांना आपला जीव गमवावा लागला होता. या दुर्दैवी घटनेमुळे वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र दिंडी महामार्गाची आवश्यकता प्रकर्षाने जाणवली. या पार्श्वभूमीवर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या माध्यमातून केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांच्याकडे आपण सातत्याने पाठपुरावा केला. वारकऱ्यांना सुरक्षितपणे पंढरपूरची वारी करता यावी, यासाठी शेगाव ते पंढरपूर दिंडी महामार्गाची निर्मिती व्हावी, अशी आग्रही मागणी केली. या पाठपुराव्यामुळे दिंडी महामार्गाच्या कामाला मंजुरी मिळाली आणि वाटूर येथे या महामार्गाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला, असे आमदार लोणीकर यांनी सांगितले. या महामार्गामुळे वारकऱ्यांच्या सुरक्षिततेला महत्त्व प्राप्त झाले असून, पायी वारी करणाऱ्या भाविकांसाठी स्वतंत्र मार्ग उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. परतूर विधानसभा मतदारसंघाच्या हद्दीत या महामार्गाची सुमारे ९५ किलोमीटर लांबी असून, मंठा तालुक्यातील सरहद्दीवरील वडगावपासून तळणी फाटा, वाटूर, परतूर आणि आष्टीमार्गे हा मार्ग माजलगावच्या दिशेने जातो, अशी माहिती त्यांनी दिली.

**गुरुमाऊलींच्या विचारांतून विश्वकल्याणाचा संदेश - आमदार बबनराव लोणीकर**

पुढे बोलताना आमदार लोणीकर यांनी परब्रह्म भगवान श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने परमपूज्य गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक आणि आध्यात्मिक उपक्रमांचाही उल्लेख केला. परमपूज्य गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांनी विश्वकल्याण, राष्ट्रीय उन्नती आणि समाजातील विविध समस्यांचे निराकरण या उद्देशाने अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या विचारांतून आध्यात्मिक *(पान २ वर)*

---

# ज्ञानदीपच्या धारेश ढेपलेचे कुस्ती स्पर्धेत यश व शाळेकडून सत्कार

**वाळूज - प्रतिनिधी**

ज्ञानदीप इंग्लिश स्कूल, साजापूर येथील विद्यार्थी धारेश ढेपले याने १४ वर्षांखालील जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत ब्राँझ पदक पटकावले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ज्ञानदीप इंग्लिश स्कूलमध्ये त्याचा सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल शाळेच्या वतीने धारेश ढेपलेचे अभिनंदन करण्यात आले. त्याला मार्गदर्शन करणारे शिक्षक श्री.रामचंद्र बाबा सूर्यवंशी ,सामाजिक कार्यकर्ते श्री. बंटी भैय्या तसेच त्याच्या पालकांचेही कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी करावी, यासाठी शाळा नेहमीच प्रोत्साहन देत असल्याचे शाळेचे संस्थाचालक रोहिदास शार्दुल यांनी सांगितले. धारेशच्या या यशाबद्दल संस्थेचे संचालक रोहिदास शार्दुल, उपसंचालक प्रफुल्ल कुवर, शाळेच्या सचिव सौ.संगीता शार्दुल, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक बारोटे, मुख्याध्यापिका सौ.शीतल शहापूरकर व मुख्य अॅडमिन सौ.दुर्गा हिरे यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# सिद्ध समाधी योग तर्फे श्री दुर्गा सप्तशती दुर्लभ बीज साधना

**जालना - प्रतिनिधी**

सिद्ध समाधी योग एस एस वाय जालना च्या वतीने नवरात्रीमध्ये सप्तशती चे पाठ तथा देवी मंत्राचे पठण व साधना नऊ दिवस करण्यात आली. त्याचा समारोप श्री अशोक मराठे काका यांच्या निवास स्थानी झाली. त्याआधी सर्वश्री गोविंद राठी ,भक्ती राम राठोड ,श्री देशमाने, विनोद साहूजी ,सीए गोविंद प्रसाद मुंदडा, प्रकाश बोरा, ऍड, समदानी, राजकुमार रुणवाल यांच्या प्रत्येकाच्या निवासस्थानी खूप जल्लोषात कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले .या बीज मंत्र साधनेत



सर्वश्री श्रवण भुरेवाल ,परमानंद ओझा, सौ ज्योतिमा राठोड, सो सो रेखा सावजी , सौ संतोषी बोरा ,सौ सुनिता देशमाने ,सौ संध्या मराठे,सौ शुभांगी राठी, तसेच सौ सुनीता रुणवाल व सौ सुनीता समदानी यांची उपस्थिती होती.

# आज बालाजी महाराजांची पालखी मिरवणुक

**जालना - प्रतिनिधी**

जुना जालना भागातील कचेरी रोडवरील बालाजी मंदिरमध्ये विजयादशमी निमित्त मंगळवार दि.२० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ९ वाजता श्री बालाजी महाराजांची पालखी मिरवणुक काढण्यात येणार आहे. ही मिरवणुक कचेरी रोड, वृंदावन कॉलनी, मुक्तेश्वर महादेव मंदिर, कोळेश्वर गल्ली, गणपती गल्ली, शास्त्री मोहल्ला, आनंदीस्वामी गल्ली मार्गे कचेरी रोड अशी निघणार आहे. यावेळी भजनी मंडळी तसेच ढोलपथक देखील सोबत राहणार आहे. या पालखी मिरवणूकीत जास्तीत जास्त बालाजी भक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थान श्री बालाजी मंदिरच्या वतीने करण्यात आले आहे. ही पालखी बांधण्याचा मान या परिसरातील गुजराथी समाजाचा असून ही परंपरा त्यांची पुढील पिढीही तेवढ्याच भक्तीभावाने जपत आहे.



---

# दुष्काळात मायक्रो फायनान्सची हप्ते वसुली तत्काळ थांबवा जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव यांचे प्रशासनाला निवेदन

**जालना- प्रतिनिधी**

जिल्ह्यासह भोकरदन - जाफराबाद तालुक्यात दुष्काळी परिस्थिती गंभीर बनली असून, शेतकरी, शेतमजूर, दूध उत्पादक आणि

लघुउद्योजक आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून सुरू असलेली कर्जाच्या हप्त्यांची वसुली तत्काळ

थांबवावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे

केली आहे. शेतकरी, महिला शेतमजूर, दूध उत्पादक तसेच छोटे व्यावसायिक बचत गटांच्या माध्यमातून मायक्रो फायनान्स संस्थांकडून कर्ज घेतात. या कर्जाची परतफेड दरमहा हप्त्यांच्या स्वरूपात केली जाते. संबंधित संस्थांचे



अधिकारी गावोगावी जाऊन हप्त्यांची वसुली करतात. मात्र, सध्याच्या दुष्काळी

परिस्थितीमुळे ठाामीण अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला असून, कर्जदारांसमोर हप्ते भरण्याचे गंभीर संकट उभे राहिले आहे. पावसाअभावी शेतातील पिके करपून गेल्याने खुरपणी, खतांची फवारणी आणि इतर शेतीकामे ठप्प झाली आहेत. परिणामी, शेतमजुरांच्या रोजगारावरही परिणाम झाला आहे.

खरीप हंगाम मोठ्या प्रमाणात वाया गेल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले असून, आगामी रब्बी हंगामाबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे.

उत्पन्नाचे स्रोत कमी झाल्याने मायक्रो फायनान्सच्या कर्जाचे हप्ते आणि त्यावरील व्याज भरणे कर्जदारांसाठी कठीण झाले आहे. हप्ते भरण्यासाठी पैसे उपलब्ध नसल्याने काही कर्जदारांना पुन्हा सावकारांकडून कर्ज घेण्याची वेळ येत आहे, तर काही कुटुंबांना कर्जफेडीसाठी घरातील सोने-नाणे किंवा पशुधन

विकण्याची वेळ येण्याची भीती आहे.

कर्जवसुलीला काही कालावधीसाठी स्थगिती द्या- जिल्हाप्रमुख या गंभीर परिस्थितीचा विचार करून शासनाने मायक्रो फायनान्स संस्थांच्या कर्जवसुलीला काही कालावधीसाठी स्थगिती द्यावी. तसेच कर्जावरील व्याजात शिथिलता द्यावी, थकीत हप्त्यांवर दंड आकारू नये आणि केवळ हप्ता

थकल्यामुळे कर्जदारांच्या सिबिल (ण्द्घ्ध्) स्कोअरवर विपरीत परिणाम होणार नाही, यासाठी आवश्यक निर्देश द्यावेत. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत

सापडलेल्या ठाामीण भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करावा,अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख मनिष

श्रीवास्तव यांनी केली आहे.

# जालना जिल्ह्यात २३ ऑक्टोबरला मतदान; मतदार केंद्रांवरील तयारीचा आढावा

## पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून मतदान केंद्रांची पाहणी

**जालना - प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने ०५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ चा कार्यक्रम जाहीर केला असून, येत्या २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा प्रशासनाने मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक तयारीला वेग दिला आहे. याच अनुषंगाने जालना तालुक्यातील मतदान केंद्र क्रमांक २३०२ येथे जिल्हा औद्योगिक व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयातील खोली क्रमांक ०१ मधील मतदान केंद्राची जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पाहणी केली. या पाहणीवेळी पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग सिंधू, उपविभागीय अधिकारी रामदास दौड, उप आयुक्त श्रीमती गायकवाड, तहसीलदार तसेच निवडणूक विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी आशिमा मित्तल यांनी मतदान केंद्रावर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या मूलभूत सुविधांची तपासणी केली. यामध्ये पाणी, वीज, शौचालय, बैठक व्यवस्था, दिव्यांग मतदारांसाठी आवश्यक सुविधा तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. मतदान प्रक्रिया सुरळीत, सुरक्षित आणि व्यवस्थित पार पडण्यासाठी मतदान केंद्रांवर आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध असणे महत्त्वाचे असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. तसेच मतदान केंद्रांवर किमान महत्त्वाच्या सुविधा आणि आवश्यक व्यवस्था पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत की नाहीत, याची खात्री करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. मतदान प्रक्रियेत कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, तसेच मतदारांना मतदानाचा हक्क बजावताना आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देशही या पाहणीदरम्यान देण्यात आले.

---

# भगवान बिरसा मुंडा जयंतीनिमित्त बुधवारी नियोजन बैठक

## आदिवासी, दलित, ओबीसींसह सर्व समाजबांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

आदिवासी समाजाचे जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांच्या नियोजनासाठी आदिवासी समाज विकास मंच, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक जालना येथील राजारामनगर, रेल्वे स्टेशन रोडवरील कृष्णा प्लाझा येथील माँ सेवाभावी संस्था कार्यालयात होणार आहे. भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या नियोजनासह विविध विषयांवर या बैठकीत चर्चा करण्यात येणार आहे.

या बैठकीस आदिवासी, दलित, ओबीसी तसेच सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मंचाचे संस्थापक अध्यक्ष गोकुळ स्वामी यांच्यासह बागेश्वर इंद्रोले, उज्वला साबळे, जयकिशोर गाजले, दीपक गुरवे, कामिनी कोडगट्टी, नरेश अन्टले, सचिन आनंदे, गणेश पवार, सतीश नाटेकर, रजिकांत बंडल्लु, अंगत कापरे, विनोद बोडले, अजय निलवंत, बाळकृष्ण कोत्ताकोडा, बाळासाहेब कपे, माणिक तोटे, रमेश पारेबलु व शिवाजी माळी यांनी केले आहे.

# परतूर येथील श्री साईनाथ मंदिर परिसरात आज भव्य रावणदहन

**परतूर - प्रतिनिधी**

शहरातील श्री साईनाथ मंदिर परिसरात मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजताविजयादशमी-दसऱ्यानिमित्त भव्य रावणदहन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते रावणाच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन होणार आहे.

गेल्या ३० वर्षांपासून दसरा उत्सव समिती या परंपरेचे जतन करत आहे. समितीचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार भारुका, उपाध्यक्ष अजय देसाई, सचिव कैलास सोळंके, कोषाध्यक्ष माणिक जैस्वाल व इतर सर्व सदस्य या कार्यक्रमाचे आयोजन करत आहेत. दरवर्षी या सोहळ्यास १० हजारांपेक्षा अधिक भाविक मोठ्या उत्साहाने उपस्थिती लावतात. या कार्यक्रमास माँ बागेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव, राहुल लोणीकर, नितीन जेथलिया, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश









नळगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कपिल आकात, माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल आकाश राक्षे.बद्रीभाऊ ढवळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे, पोलीस निरीक्षक कलमदाने तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांसह सर्वपक्षीय आजी माजी पदाधिकारी, नगरसेवक व्यापारी, पत्रकार व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने वाजत-गाजत सहभागी व्हावे, असे आवाहन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. दसरा उत्सवाच्या या पारंपारिक सोहळ्यामुळे परतूर शहरात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.